**अतिमहत्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक सा.प्र.वि./१/कावि/१४९/२०२४,
दिनांक ११/०६/२०२४

**विषय** - दिनांक १/११/२००५ पुर्वी पदभरती जाहिरात / अधिसुचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकिय अधिकारी / कर्मचारी यांची माहिती मिळणेबाबत...

**परिपत्रक**

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४ दिनांक ०२/०२/२००४ अन्वये दिनांक ०१/११/२००५ पुर्वी पदभरती जाहिरात / अधिसुचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतूदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय (One Time Option) देण्यात येत असलेबाबत शासन निर्णय पारीत झालेले आहेत.

शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा सदर पर्याय हा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत देणे बंधनकारक राहील.जे राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी या ६ महिन्यांच्या कालावधीत जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत, त्यांनी राष्ट्रीय वेतन प्रणाली (NPS) लागू राहील. याबाबत शासन निर्णय देण्यात आलेला आहे.

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४ दिनांक ०२/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ज्या अधिकारी / कर्मचा-यांची पदभरती जाहिरात / अधिसुचना ही दिनांक ०१/११/२००५ पुर्वी निर्गमित झालेली आहे. तथापि ते अधिकारी / कर्मचारी दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेले आहेत. अशा सर्व अधिकारी / कर्मचा-यांची सविस्तर माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' मधील विहित नमून्यात भरुन दिनांक १४ /०६/२०२४ पर्यत विभागप्रमुखांच्या स्वयस्पंष्ट शिफारशीनुसार सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात यावी.

सदरचे परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन द्यावे. अधिकारी / कर्मचा-यांची माहिती पाठविण्यास विलंब झाल्यास अथवा माहिती विहित मुदतीत वेळेत प्राप्त न झालेस संबंधित विभागप्रमुखांस जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

प्रपत्र 'अ'

दिनांक १/११/२००५ पुर्वी पदभरती जाहिरात / अधिसुचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकिय अधिकारी / कर्मचारी यांची माहिती

**विभागाचे नाव -**

| अ.क्र | अधिकारी / कर्मचा-यांचे नाव | मनपा सेवेत रुजू होतेवेळीचे पदनाम | मनपा सेवेतील प्रथम नियुक्ती आदेश क्र. | मनपा सेवेतील रुजू दिनांक | सेवानोंद पुस्तकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत तसेच अधिकारी / कर्मचारी यांची मनपा सेवेत रुजू दिनांकाची नोंद घेण्यात आलेल्या सेवानोंद पुस्तकाच्या पानाची छायांकित प्रत |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

विभागप्रमुखाचे नाव व स्वाक्षरी